मराठी अभ्यास परिषद पत्रिका

# भाषा आणि जीवन



विद्यापीठ अनुदान आयोगाच्या घोषित यादीतील
विद्वत् प्रमाणित नियतकालिक

वर्ष ४०, अंक ३, पावसाळा २०२२

मराठी अभ्यास परिषद पत्रिका - भाषा आणि जीवन
विद्यापीठ अनुदान आयोगाच्या घोषित यादीतील विद्वत्-प्रमाणित त्रैमासिक
RNI 40048 ISSN : 2231-4059
वर्ष ४०, अंक ३, पावसाळा २०२२ ( जुलै-सप्टेंबर २०२२)

## अनुक्रमणिका


- परिषद वार्ता / **अशोक केळकर भाषा अभ्यासक पुरस्कार** / प्रचित्रे आणि मानपत्र / ०३, ५५
- संपादकीय / **भाषेची वाढ** / आनन्द काटीकर / ०५
- लेख / **कोकणातील तिलोरी कुणबी बोली** / सीमा राजेश वीर / ०७
- लेखक परिचय / १९
- लेख / **बालकांची भाषा** / विद्या सुर्वे-बोरसे / २०
- लेख / **भटक्या-विमुक्तांच्या आत्मकथनांतील भाषा** / प्रवीण रामदास जाधव / २४
- पुनर्भेट / **विल्यम कॅरी : पहिला मराठी ग्रंथमुद्रणकर्ता आणि समाज-सुधारकही** / अविनाश कोल्हे / २९
- मराठीचे शिलेदार / **विल्यम कॅरी** / संकलित - मराठी विश्वकोश / ३२
- ज्याची त्याची प्रचीती / **आताशा आपल्यासमोर येणारी मराठी भाषा** / शरदिनी मोहिते / ३४
- लेख / **विज्ञानसाहित्य आणि मानवी जीवनाचा सहसंबंध** / चिन्मय मधू घैसास / ३६
- पुस्तक परीक्षण / **भाषाविचाराचा लालित्यपूर्ण आविष्कार - द. दि. पुंडे यांची २ पुस्तके** / विनायक गंधे / ४२
- दखलयोग्य / **'ऑक्सफर्ड कॉलोकेशन्स : डिक्शनरी फॉर स्टुडंट्स ऑफ इंग्लिश'** / कुमार केतकर / ५२
- भाषा वार्ता / **डॉ० मुहम्मद आझम यांना साहित्य अकादमीचा 'भाषा सन्मान पुरस्कार'** / ५४


### मुखपृष्ठाविषयी : पक्षी - खंडया : प्रचित्रकार - अजित वैशंपायन

**मराठी अभ्यास परिषद पत्रिका - भाषा आणि जीवन** या नियतकालिकाच्या चाळिसाव्या वर्षातील सर्व अंकांच्या मुखपृष्ठासाठी भारतात आढळणारे पक्षी आणि त्यांची खास मराठी नावे अशी संकल्पना आहे. त्यानुसार या अंकाच्या मुखपृष्ठावर खंडया हा पक्षी विराजमान झालेला आहे. किंगफिशर (White throated Kingfisher) या नावाने ओळखला जाणारा हा छोटेखानी पक्षी त्यांच्या पंखांवर असणाऱ्या नीलवर्णामुळे आकर्षून घेतो. हा लहान आकारातील पाणथळी जागेजवळ राहणारा पक्षी आहे. भारतामध्ये नऊ प्रकारचे खंड्या पक्षी आढळतात. पाण्यावर शिकारीसाठी एकाग्रतेने फडफड करून अत्यंत वेगाने पाण्यात सूर मारून शिकार करणे हे या पक्ष्याचे वैशिष्ट्य आहे.

मराठी अभ्यास परिषद पत्रिका - भाषा आणि जीवन
त्रैमासिक : हिवाळा (जानेवारी), उन्हाळा (एप्रिल), पावसाळा (जुलै), दिवाळी (ऑक्टोबर)
विद्यापीठ अनुदान आयोगाच्या घोषित यादीतील विद्वत्-प्रमाणित त्रैमासिक
RNI 40048 ISSN : 2231-4059
वर्ष ४०, अंक ३, पावसाळा २०२२ ( जुलै-सप्टेंबर २०२२)

भाषा आणि जीवन

: संपादन समिती :
संपादक : आनन्द काटीकर
कार्यकारी संपादक : विजय पाध्ये
सदस्य : सलील वाघ, वैशाली कार्लेकर, कलिका मेहता
प्रकाशक, मुद्रक, संपादकीय व व्यवस्थापकीय पत्रव्यवहार आणि वर्गणी पाठवण्यासाठी पत्ता -
आनन्द काटीकर, 'पसायदान' बंगला क्र. ७, फर्ग्युसन महाविद्यालय आवार, गोखले मार्ग, डेक्कन जिमखाना, पुणे ४११ ००४
संपर्क : ९४२१६ १०७०४
ई-पत्ता : marathi.abhyas.parishad@gmail.com
मुद्रणस्थळ : विनायक एन्टरप्रायझेस, ५१७ कसबा पेठ, पुणे ४११ ०११

वर्गणीचे दर
व्यक्ती आणि संस्था

| | |
|---|---|
| वार्षिक | ३००/- |
| त्रैवार्षिक | ८५०/- |
| पंचवार्षिक | १,४००/- |

आजीव सभासद (व्यक्तींसाठी) १०,०००/-
सुट्या अंकाची किंमत - रू. ७५/-

◆ ◆ ◆ ◆

- थेट बँकेत वर्गणी भरण्यासाठी सूचना -
खातेधारक नाव : मराठी अभ्यास परिषद
खाते क्रमांक : २००५ ७१६ ४२६०
बँकेचे नाव : बँक ऑफ महाराष्ट्र
शाखा : टिळक रस्ता, पुणे
IFSC : MAHB 00 000 41

वर्गणी भरल्यावर ९४२०३ २२९८२, ९४२१६ १०७०४ किंवा ९४२३५ ८६२८६ या क्रमांकावर संपूर्ण नाव सविस्तर पत्त्यासह व्हॉटसॲप संदेशाद्वारे किंवा ई-पत्राद्वारे कळवावे.

**सूचना :** १) पत्रिकेत प्रसिद्ध होणाऱ्या कोणत्याही लेखाशी, लेखकाच्या मतांशी संपादक किंवा मराठी अभ्यास परिषद सहमत असेलच, असे नाही.

२) या अंकाच्या प्रकाशनासाठी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदान मिळाले आहे. तथापि या अंकात प्रसिद्ध झालेल्या कोणत्याही लेखाशी, लेखकाच्या मतांशी महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ आणि महाराष्ट्र शासन सहमत असेलच, असे नाही.

३) मराठी अभ्यास परिषद पत्रिका - भाषा आणि जीवन हे विद्वत्-प्रमाणित त्रैमासिक आहे. येथे प्रसिद्ध होणारा कोणताही लेख त्या विषयातील तज्ज्ञांच्या अभिप्रायानंतरच प्रकाशित केला जातो. त्यामुळे लेखकांनी लेख पाठवताना प्रकाशनासाठी लागणारा काळ लक्षात घ्यावा, ही विनंती.

मुखपृष्ठ : पक्षी - खंड्या : प्रचित्रकार - अजित वैशंपायन ॥ मुखपृष्ठ रचना : आर्या काटीकर

# विज्ञानसाहित्य आणि मानवी जीवनाचा सहसंबंध

चिन्मय मधू घैसास

मानवी जीवनाला फार मोठ्या प्रमाणात व्यापणारा एक महत्त्वाचा घटक म्हणजे विज्ञान. मानवी जीवनावर विज्ञानाचा प्रचंड परिणाम झालेला आहे. आग, चाक, वाफेचे इंजिन, क्ष-किरण, परमाणू शक्ती, हवाई उड्डाण, संगणक, आंतरजाल तंत्रज्ञान, जैव-अभियांत्रिकी संशोधन यांसारख्या अनेक महत्त्वाच्या शोधांमुळे मानवी जीवनाला आणि एकूणच त्याच्या अस्तित्वाला निर्णायक कलाटणी लाभली आहे. या सर्व शोधांचा आणि त्यांच्यामागे असणाऱ्या सैद्धांतिक विज्ञानाचा परिचय समाजाला करून देण्याच्या उद्देशाने प्रारंभीच्या काळात मराठीत, विज्ञानविषयक माहितीपर लेखन भाषांतरित स्वरूपात आलेले आपल्याला दिसते. परंतु, काळानुरूप यात ललित साहित्याच्या अंगाने कथा-कादंबरीच्या रूपाने लेखन होऊन विज्ञानसाहित्य रूढ झालेले आपण पाहतो. ज्यूल्स वर्न -सारख्या लेखकांचे विज्ञानसाहित्य या क्षेत्रात आदर्श आणि महत्त्वाचे ठरते. मराठीत, विसाव्या शतकाच्या आरंभी सुरू झालेले विज्ञानसाहित्य आजवर वेगवेगळी स्थित्यंतरे स्वीकारत, विविध विषयांना स्पर्श करत अभूतपूर्व दिशेने पुढे जाताना आपल्याला दिसते. विज्ञानाचा वाढता प्रसार आणि मानवी जीवनावरील त्याच्या प्रभावाची अधिकाधिक स्पष्ट कल्पना येण्यासाठी विज्ञानसाहित्याचे कार्य खूप महत्त्वाचे आहे.

आज आपण सर्वजण विज्ञानयुगात वावरत आहोत आणि आपल्याभोवती विज्ञानाची विविध रूपे क्षणोक्षणी प्रत्ययास येतात. आज विज्ञानामध्ये आपल्या एकूण जीवनपद्धतीला, भोवतालच्या जगाला आणि पर्यायाने मानवी अस्तित्वाचे भविष्यच आमूलाग्र पद्धतीने बदलून टाकण्याची क्षमता आहे. अशा वेळेस या विज्ञानाचा शक्य तेवढा परिचय आपल्याला होणे आवश्यक आहे. हा परिचय शास्त्रीय पद्धतीने, संशोधक वृत्तीने आणि वैज्ञानिक माहिती देणारी पुस्तके वाचूनच करून घेण्याची गरज आहे असे नव्हे. वास्तविक, कोणत्याही सामान्य माणसाला अशा शास्त्रीय ग्रंथाचे वाचन करून विज्ञान समजून घेणे जमेलच असे नाही. अशा या टप्प्यावर विज्ञानसाहित्य समाजाच्या कामी येते. ललित साहित्यकृतीच्या माध्यमातून, कथानकाच्या रूपात गुंफून, कलात्मक पद्धतीने शास्त्रीय माहिती सोप्या पद्धतीने देण्याचे कार्य विज्ञानसाहित्य करते. प्रामुख्याने, कथा-कादंबरी यांसारख्या साहित्यप्रकारांच्या आधाराने शास्त्रीय माहिती समाजापर्यंत पोचवण्याचा प्रयत्न विज्ञानसाहित्य करत असते. भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र, प्राणिशास्त्र, वनस्पतिशास्त्र, वैद्यकशास्त्र यांच्या जोडीलाच खगोलशास्त्र, जैव-अभियांत्रिकीशास्त्र यांसारख्या प्रगत विज्ञानशाखांचाही समावेश विज्ञानसाहित्याच्या

कथानकात झालेला दिसतो.

आजवरच्या प्रस्थापित वैज्ञानिक प्रगतीचा आलेख पाहता भविष्यात मानवी जीवन कसे असेल याचा विचार विज्ञानसाहित्य प्रामुख्याने करते. वास्तविक, भविष्यात मानवी जीवन कसे असेल आणि भविष्यातील एखाद्या विशिष्ट काळात मानवी समाज कसा असेल याची शाश्वती कधीच देता येत नाही. परंतु, सद्यकाळापर्यंत माणसाने जे साध्य केले आहे त्यावरून पुढे काय घडू शकते याची कल्पना मात्र करता येते. ही कल्पना करताना केवळ भविष्यातील वैज्ञानिक प्रगती आणि अति-आधुनिक तंत्रज्ञान यांचाच विचार महत्त्वाचा नसतो तर त्यामागे मानवी जीवनातील बदलणारे संदर्भ, जाणिवा, तत्त्वे, मूल्ये, संकल्पना यांचाही विचार आपल्याला दिसतो.

वास्तविक, विज्ञान हा अनेकदा अनेकांना किचकट वाटणारा विषय असल्याने त्या वाटेने अनेक लोक जात नाहीत परंतु, कथा-कादंबरीच्या माध्यमातून जेव्हा ललित रूपात हेच विज्ञान आपल्या भेटीला येते तेव्हा, डॉ० नारळीकरांच्या शब्दात सांगायचे तर 'शर्करावगुंठित गोळी' पोटात जाते आणि या गोष्टी समाजाच्या पचनी पडू लागतात. शास्त्रीय माहिती देणाऱ्या पुस्तकाच्या तुलनेत विज्ञानसाहित्यातील भाषा सहज-सोपी असल्याने त्याचे आकलन सोपे होते.

दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे, विज्ञानसाहित्यात विज्ञान हा घटक जरी केंद्रस्थानी असला तरी त्याच्याभोवती फिरणारे मानवी जीवन आणि त्यातील विविध पैलू हेच आपल्या चर्चेचे मुद्दे असतात. व्याकरणिक भाषेत सांगायचे तर 'नाम' म्हणून येणारा 'विज्ञान' हा शब्द 'विज्ञान-साहित्य' या संज्ञेत विशेषण या रूपाने येतो. याचाच अर्थ विज्ञानसाहित्यातून 'विज्ञानशिक्षण' हा हेतू साध्य करायचा नसतो तर विज्ञान आणि मानवी जीवन यांचा सहसंबंध आपल्याला अधोरेखित करायचा असतो.

विज्ञानसाहित्य असे म्हणताना एका बाजूला विज्ञानाची शास्त्रीय माहिती देणारे लेखन तर दुसऱ्या बाजूला विज्ञान आणि मानवी जीवन यांचा सहसंबंध दर्शवणारे ललित लेखन असे दोन प्रकार आपल्याला दिसून येतात. शास्त्रीय माहिती देणाऱ्या विज्ञानसाहित्यात, विज्ञानाच्या विविध अभ्यासशाखांची, अंगांची, विभागांची, घटकांची शास्त्रीय मांडणी केलेली दिसून येते. पण ज्याला रूढ अर्थाने विज्ञानसाहित्य म्हणून आपण ओळखतो त्यात विज्ञानाची ललित मांडणी करताना विज्ञानाचा मानवी जीवनावरील परिणाम आणि प्रभाव सांगितलेला असतो. असे करताना कथा, कादंबरी, कविता, नाटक यासारख्या साहित्यप्रकारांचा आधार घेतला जातो. या प्रकारांतून लेखन करताना विविध प्रसंगी पारिभाषिक शब्दांचा वापर लेखक करतात.

सांप्रत काळातील वैज्ञानिक प्रगतीच्या आधारे भविष्यकाळाचा वेध घेताना

वर्तमानातील भाषा, विज्ञानाच्या क्षेत्रातील विविध संकल्पना आणि परिभाषा यांचा उल्लेख आणि वापर कथानकाच्या माध्यमातून साहित्यकृतीत होत असतो. खगोलविज्ञान, रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र यांसारख्या क्षेत्रांची पार्श्वभूमी असलेल्या कथानकाला प्रभावीपणे व्यक्त करण्यासाठी या पारिभाषिक संज्ञांचा वापर करावा लागतो. नवनवीन वैज्ञानिक शोधांमुळे नवनवीन संज्ञा आणि परिभाषा निर्माण होत असतात. त्या सर्वांना व्यवहाराच्या भाषेत समर्पक शब्द सापडतोच असे नाही. अनेकदा मूळ शब्दच लेखकाला वापरावा लागतो. विशिष्ट एखादी संकल्पना स्पष्ट होण्यासाठी लेखकाला ती संज्ञा वापरण्यावाचून गत्यंतर नसते. उदाहरणार्थ, जयंत नारळीकर यांच्या कथा-कादंबऱ्यांत खगोलशास्त्राशी संबंधित वर्णनात असे विविध शब्द सापडतात.

अशा पारिभाषिक संज्ञांचा वापर केल्यामुळे अनेकदा लेखन दुर्बोध होण्याची दाट संभावना असते. बऱ्याच वेळेस पारिभाषिक संज्ञा खूपच तांत्रिक स्वरूपाची असते. कथानकाच्या ओघात त्याचा वापर अनिवार्य असला तरी अर्थबोध न झाल्याने सर्वसामान्य वाचकाला त्याचे सखोल आकलन होत नाही. लेखकाने त्या संज्ञेला अनुसरून सविस्तर विवेचन वा स्पष्टीकरण केलेले असल्यास त्याचा ढोबळ अंदाज वाचकाला येतो. अशा संज्ञांचा वापर केल्याने काहीशी दुर्बोधता येण्याची शक्यता असली तरी हा वापर अतिशय महत्त्वाचा असतो कारण त्यामुळेच त्या विज्ञानसाहित्य लेखनाला धार येत असते. दुसरीकडे या अनुषंगाने उद्भवणाऱ्या तथाकथित दुर्बोधतेचा विचार केल्यास, संबंधित विज्ञानसाहित्यकृतीच्या निमित्ताने, वाचकाने त्या संज्ञेविषयी वा त्या संकल्पनेविषयी अधिक माहिती मिळवावी आणि त्याद्वारे वाचकांचे विज्ञानविषयक ज्ञान वाढीस लागावे हाही हेतू महत्त्वाचा मानला गेला पाहिजे. सर्वसामान्य व्यक्तीला आणि वाचकाला विज्ञानाची अधिकाधिक माहिती होणे, वैज्ञानिक जाणीव निर्माण होणे आणि वैज्ञानिक दृष्टी विकसित होणे या विज्ञानसाहित्याच्या उद्दिष्टांचा विचार करता, त्यांच्या पूर्ततेसाठी अशा पारिभाषिक संज्ञांचा वापर आवश्यकच असतो असे म्हणता येते.

विज्ञानसाहित्याच्या अधिकाधिक प्रसारामुळे समाजात विज्ञानाधिष्ठित विचारसरणी वाढीस लागते आणि समाजातील गैरसमजुती, अंधश्रद्धा यांचेही प्रमाण कमी होण्यास मदत होते. आपल्या भोवतालच्या जगाकडे आपण वैज्ञानिक दृष्टीने कसे पाहावे, याचा एक दृष्टिकोन विज्ञानसाहित्य समाजाला देत असते. वैज्ञानिक अज्ञानापोटी जगातील चमत्कारिक गोष्टींकडे माणूस दैववादी भावनेने पाहतो. मात्र ज्या वेळेस त्यामागील विचार स्पष्ट होतो, त्यावेळी मात्र समाजाच्या विचारांना एक नवी दिशा लाभते. विज्ञानसाहित्य प्रामुख्याने मानवी जीवनाच्या भविष्याकडे लक्ष देते आणि त्यावरच त्याचे भाष्य असते. विज्ञानकथा-कादंबऱ्यांच्या कथानकातून ही बाब आपल्याला स्पष्टपणे

जाणवते. भविष्याकडे नजर लावून बसलेले विज्ञानसाहित्य आजही परग्रहवासी, खगोल, अवकाश यांची फार चर्चा करताना दिसते. भविष्यात यदाकदाचित माणूस आणि एखाद्या अज्ञात परग्रहावरील अतिप्रगत जीवांचा एकमेकांशी परिचय होईल, असा विचार या साहित्यात केलेला दिसतो. या अशा साहित्यातील बराचसा भाग हा जरी काल्पनिक किंवा संभाव्य मानला तरी देखील अशा प्रकारच्या परिस्थितीत खरोखरीच आपण काय करू? अशी एखादी घटना घडलीच त्याचा पृथ्वी, मानवी जीवन आणि इतर सर्व घटकांवर काय परिणाम होईल, याचा विचार करायला विज्ञानसाहित्य भाग पाडते.

कालप्रवास करून भूतकाळाकडे पाहणाऱ्या काही अपवादात्मक साहित्यकृती वगळल्यास विज्ञानसाहित्य प्रामुख्याने भविष्यकाळाचाच विचार करणारे असते. हा विचार प्रामुख्याने भविष्यातील मानवाची नीतिमत्ता, संस्कृती, समाजव्यवस्था, मूल्ये, तत्त्वे आणि बदलत्या जाणिवांभोवती फिरताना दिसतो. उदाहरणार्थ, मानवी जीवनात यंत्रमानवाचे वाढते प्रस्थ पाहता आगामी काळात यंत्रमानवच जगाचे राज्यकर्ते, सर्वेसर्वा होतील का, असा प्रश्न निर्माण होतो. दैनंदिन गोष्टींसाठी यंत्रमानवाचा वाढता वापर झाल्यास मानवी भावना, संवेदनशीलता टिकून राहील का, अशीही शंका उपस्थित होते. अशा वेगवेगळ्या प्रश्नांचा विचार विज्ञानसाहित्य करायला लावते. आजवर झालेल्या वैज्ञानिक प्रगतीचा आलेख काढणे वा त्याचा लेखाजोखा मांडणे हे विज्ञानसाहित्याचे कार्य नसते. भविष्यातील मानवी जीवनावर वैयक्तिक आणि सामूहिकरित्या कोणते परिणाम होऊ शकतात, याची चर्चा करतानाच माणसा-माणसातील परस्परसंबंध कसे असतील, याचे चित्रण महत्त्वाचे ठरते. विज्ञानसाहित्यात गृहित धरलेली माणसाची वा समाजाची भविष्यकाळातील एखादी कृती प्रत्यक्षात येईलच असे काही खात्रीपूर्वक सांगता येत नसते, पण त्यासाठी तयार राहण्याची आगाऊ सूचना देण्याचे काम विज्ञानसाहित्य करते.

मानवाच्या एकूण निर्मितीचा आणि अस्तित्वाचा विचार करता विज्ञानसाहित्याच्या आधारे मानवी जीवनाचा इतिहास डोळसपणे आणि चिकित्सकपणे निरखण्याचे काम विज्ञानसाहित्य करायला लावते. भविष्याकडे पाहणारे विज्ञानसाहित्य आपल्या पूर्वसुरींकडेदेखील पाहायला भाग पाडते आणि त्यातून समाजाच्या अस्तित्त्वाच्या काही वेगळ्या दिशादेखील आपल्याला सापडतात. जगातील वेगवेगळ्या मिथकांतून, पुराणकथांतून ज्या अलौकिक आणि चमत्कारिक जीवांचा, घडामोडींची चर्चा केली जाते, त्याचाही विचार विज्ञानसाहित्याच्या आधाराने विज्ञानाधिष्ठित दृष्टिकोन तयार झालेला समाज करू शकतो. उदाहरणार्थ, एरिक वॉन डेनिकनसारख्या लेखकांच्या लिखाणाचा आधार घेतला आणि त्यांनी आपल्या 'चॅरियट्स ऑफ द गॉड्स' या ग्रंथात मांडलेल्या तथ्यांचा विचार करता आपल्या अस्तित्वाविषयी आपण पुन्हा एकदा विचार करायला

लागू. विज्ञानाने ज्या गोष्टींचा शोध अगदी अलिकडच्या काळात लावलेला दिसतो, त्याच गोष्टींचा उल्लेख जुन्या काळातील ग्रंथांत कसा काय दिसून येतो हा विचार आपल्याला विचार करायला लावतो. पृथ्वीवर परग्रहींचे येणे-जाणे होते असे म्हणत त्याचे अनेक पुरावे डेनिकनच्या पुस्तकात सापडतात. अशा संदर्भांच्या जोरावर मानवी अस्तित्वाविषयी मांडण्यात आलेले 'झू' आणि 'जंगल' सिद्धांतदेखील विचारात घ्यावेच लागतात. मानव हा खरोखरीच पृथ्वीवरील जीव आहे का? या ग्रहावर त्याचे कृत्रिम रोपण करण्यात आले आहे की काय? फार जुन्या काळात मानव आणि अति-प्रगत परग्रही एकत्र नांदत होते का? आपल्यासारखी अन्य एखादी जीवसृष्टी ब्रह्मांडाच्या अन्य एखाद्या कोपऱ्यात आहे का? ब्रह्मांड म्हणजे नक्की काय? या आणि अशा अनेक प्रश्नांना विज्ञानसाहित्य जन्म देते आणि त्याचे उत्तर शोधण्याची जिद्द आणि दिशाही देते.

यंत्रमानव, अत्याधुनिक उपकरणे यांच्या शोधामुळे आगामी काळात मानवी आयुष्याचा चेहरामोहराच बदलून जाण्याची शक्यता बहुतेक विज्ञानसाहित्यकृतींतून वर्तवलेली दिसून येते. पृथ्वीच्या कक्षेबाहेर ब्रह्मांडाच्या वेगवेगळ्या भागांत माणूस नजिकच्या काळात आपले अस्तित्व प्रस्थापित करेल, अशा कल्पनाही बऱ्याचदा दिसतात. या सर्वांचा विचार करता अनेक सामाजिक प्रश्न आपल्यासमोर उभे ठाकतात. आपले आयुष्य पूर्णपणे यंत्रांच्या मदतीने जगण्याचा निर्णय मानवाने घेतल्यास समाज, सामाजिक बांधिलकी यासारखे काहीच राहणार नाही का? भविष्यातील यंत्रमानव खऱ्याखुऱ्या मानवाप्रमाणे प्रगत असतील, त्यांच्यात शारीरिक-मानसिक असे सर्व गुण माणसासारखे असतील, असेही विज्ञानसाहित्यात कल्पिलेले दिसते. आयुष्याचा जोडीदार म्हणून सर्वार्थाने हवा तसा एक यंत्रमानव तयार करून घेणे आणि त्याच्या वा तिच्या सोबतीने आयुष्य जगणे हे सर्वसाधारण चित्र झालेले असेल, असेही बऱ्याच विज्ञानकथांत कल्पिलेले आहे. मग यंत्रमानवातही लैंगिक भेद तयार होतील की काय? असे विचारही पुढे येऊन अस्वस्थ करतात. कारण असे झाल्यास मानवाचे सहजीवन, कुटुंब व्यवस्था, भावनिक गुंतागुंत, संवेदनशीलता यासारख्या गोष्टी कायमच्या नष्ट होऊन जातील. विज्ञानसाहित्य जरी विज्ञानाच्या प्रगतीविषयी बोलत असले तरी त्याचबरोबर मानवी स्वभावातील; ईर्ष्या, असूया, मत्सर, राग, सत्तालालसा, जिज्ञासा, कुतूहल हे मानवी स्वभावाचे पैलू कायम तसेच राहतील? या प्रश्नाचाही विचार केलेला दिसतो. विज्ञानसाहित्यातून मानवी जीवनाची अशाश्वतता, निसर्गाचे वर्चस्व मानवावर कायम उरण्याची निश्चिती, आपल्या फाजील वैज्ञानिक प्रगतीचा टेंभा मिरवणाऱ्या माणसाची होणारी संभाव्य फजिती याविषयी देखील विज्ञानसाहित्य भाष्य करते.

एकूणच, भविष्यातील भव्य आणि दिव्य अशा उजेडाची झलक दाखवण्याचा

प्रयत्न विज्ञानसाहित्य करते. पुनर्जन्म वा कदाचित मृत्यूवर विजय, परकायाप्रवेश, पृथ्वीबाहेर वास्तव्य; अशा चमत्कारिक आणि आज तरी अशक्यप्राय वाटणाऱ्या गोष्टी कदाचित भविष्यात खऱ्या होतीलही! पण तसे झालेच तर त्या अनुषंगाने मानवाने काय केले पाहिजे याचा विचार विज्ञानसाहित्य देण्याचा प्रयत्न करते. अशा एका अतिप्रगत काळात, परिस्थितीत, वातावरणात, प्रदेशात आपण असू तेव्हा आपल्या आजवरच्या कटू, रूक्ष, अमान्य, वाईट, अन्यायकारक, अमानवी बाबी तशाच पुढे नेणार आहोत की एका नव्या उमेदीने आपण एका नव्या मानवी समाजाची उभारणी करणार आहोत? अशा अनेक प्रश्नांचा विचार करायला विज्ञानसाहित्य आपल्याला दिशा देते.

विज्ञानाने आणि मुख्य म्हणजे विज्ञानसाहित्याने ज्यावेळी शास्त्रीय कारणे स्पष्ट होतात तेव्हा सांस्कृतिक वीण अधिकच घट्ट होते. समाजाचे स्वास्थ्य ही काळाची गरज आहे. त्यामुळे समाज, संस्कृती, मानवी जीवन यांचा विज्ञानाशी असणारा अनुबंध लक्षात घेता समाजसमूहासाठी विज्ञानसाहित्य किती उपयोगी, फायदेशीर आहे हे लक्षात येते. विज्ञान आणि विज्ञानसाहित्य या दोहोंतून माणूस, समाज यांची भविष्याकडील गती सिद्ध होते आणि त्यांचा विकास साधला जातो. ज्या साहित्यात विज्ञानाविषयीच्या गंभीर जाणिवा आहेत, संदर्भ आहेत, आशय-विषय आहे त्याला विज्ञानसाहित्य म्हणावे, असे साहित्य अधिकाधिक वाढीस लागले तर समाजाची विचाराची दिशा अधिकच व्यापक आणि स्पष्ट होईल.

संदर्भ :


- घाटे, निरंजन, विज्ञानवाङ्मय (लेख), मराठी वाङ्मयाचा इतिहास : खंड ७ - भाग १, महाराष्ट्र साहित्य परिषद
- कुलकर्णी, डॉ०व०दि०, घाटे, निरंजन (संपा०), विज्ञानसाहित्य आणि संकल्पना, नीहारा प्रकाशन, प्रथमावृत्ती-ऑक्टोबर १९९०
- पगारे, म० सु०, मराठी विज्ञानसाहित्य, प्रशांत पब्लिकेशन, प्रथमावृत्ती-२००४
- शिंदे, संजय, मराठी विज्ञानसाहित्य : स्वरूप, व्याप्ती आणि बदलते परिप्रेक्ष्य, प्रशांत पब्लिकेशन, प्रथमावृत्ती २०२२


•